माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १०८६/२०२२**

**अपिलार्थी,** श्री. वाय.एम. माटे,

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी,**
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जिल्हा चंद्रपूर.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जिल्हा चंद्रपूर.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०१.२०२२ | ०२.०२.२०२२ (हस्तांतरीत) | १५.०२.२०२२ | १५.०३.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक १०.०१.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "सन २०१०-११ ते डिसेंबर २०२१, जिल्हा परीषद, चंद्रपूर येथे कार्यरत कर्मचारीना प्रतिनियुक्तीने बदली करण्यात आलेली आहे. प्रतिनियुक्तीसाठी केलेला अर्ज प्रतिनियुक्ती करण्यास सक्षम अधिकारी याना शासनाने प्रदान केलेले अधिकार शासन निर्णय, प्रतिनियुक्तीचा कालावधीचे आदेश, मंजूर पद संख्येच्या १५% पेक्षा अधिक प्रतिनियुक्ती दिलेले आदेश, प्रतिनियुक्ती दिलेल्या कर्मचारीची सेवा परत केल्यानंतर पून्हा त्याच पदावर प्रतिनियुक्ती ०५ वर्ष पूर्ण केलेला नसताना प्रतिनियुक्ती केलेल्या कर्मचारीची यादी, प्रतिनियुक्ती दिलेल्या कर्मचारीवर विभागीय चौकशी सुरु नसल्याबाबत सक्षम अधिकारी यांचे आदेश प्रत" इत्यादी माहिती मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांचा अर्ज दिनांक ०२.०२.२०२२ रोजी उचित कार्यवाहीसाठी संबंधित वरिष्ठ सहायक यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १५.०२.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १५.०३.२०२२ रोजी सुनावणी घेवून अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्वरीत नि:शुल्क पुरविण्याबाबत श्री. दिपक वांढरे, वरिष्ठ सहाय्यक यांना निर्देश दिलेले असून सदर अपील याद्वारे नस्तीबध्द करण्यात येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविता येते. इतर विभागाकडून संकलीत करुन किंवा प्रक्रिया करुन माहिती पुरविण्याची तरतुद माहितीचा अधिकार अधिनियमात नाही, असा आदेश पारीत करण्यात आला.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक २१.०४.२०२२ रोजी "माहिती मिळाली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २५.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. अजय टेपलवार उपस्थित आहेत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी श्याम बाखर्डे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, उपरोक्त माहिती प्रदान करण्याविषयी जन माहिती अधिकारी यांनी मानीव जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ०२.०२.२०२२ रोजी अर्ज हस्तांतरीत केला होता. मात्र तत्कालीन मानीव जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती प्रदान न केल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी दिनांक १५.०२.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर दिनांक ०४.०३.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली व दिनांक १५.०३.२०२२ रोजी आदेश निर्गमित करण्यात आला. त्यात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती कलम २(च) प्रमाणे प्रदान करण्याविषयी तत्कालीन मानीव जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात आले असुन, अपिलार्थी यांनी वरील निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचा आक्षेन नोंदवित प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दिनांक २१.०४.२०२२ रोजी दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी २०१८ ते आजतागायतची माहिती ही तात्काळ उपलब्ध असुन ते अपिलार्थी यांना लगेच देण्यात येवू शकते, असे नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार मागितलेली माहिती ही एका नस्ती स्वरुपात सामान्य प्रशासन विभागात उपलब्ध आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रथमत: कलम २(च) प्रमाणे कार्यालयीन

अभिलेखात तात्काळ उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्ता यांना त्यांच्या रजिस्टर ई-मेल आय.डी. वर Soft Copy स्वरुपात प्रदान करण्यात यावी, व अपिलार्थी यांनी ज्या नस्तीचा उल्लेख केला आहे, त्याचा तपशील त्यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांना कळविल्यास अशा स्वरुपाची नस्ती कार्यालयीन संगणकात दस्ताऐवज स्वरुपात/फाईल स्वरुपात उपलबध असल्यास अपिलार्थी यांना त्यातील जोडपत्र अ शी संबंधीत कागदपत्रांचा पुरवठा विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २५.०६.२०२४**

जावक क्रमांक 7165 दिनांक 4 OCT 2024